

संस्कृत साहित्य सरिता

# कादम्बरी

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल. वा
दा. क्र. ५४५६

IRBK-0105456
IRBK-0105456

५४५६

संस्कृत
साहित्य
सरिता
: १९ :

बाण-कृत

# कादम्बरी

५४५६

कथासार
सौ. निर्मला स. देशपाण्डे
बी. ए. (ऑनर्स), बी. टी.

IRBK-0105456
IRBK-0105456

वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि.

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स ( प्रायव्हेट ) लि.
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
आवृत्ति पहिली : १९५६
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
शंकर रामचंद्र दाते
'यशवंत' मुद्रणालय
२००।३ सदाशिव पेठ, पुणें २

२०८८३
बा०८९१,५१
८२७
२४.१२.५५

# संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. 'संस्कृत–साहित्य–सरिता' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे–एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनता-जनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

— प्रकाशक

# परिचय

बाणभट्ट हा संस्कृत वाङ्मयांत एक महाकवि होऊन गेला. सम्राट हर्षाच्या दरबारांत त्याला मोठी मान-मान्यता मिळाली होती. 'हर्षचरित' व 'कादम्बरी' हे बाणाचे दोन गद्यग्रन्थ होत.

त्याची भाषा ओघवती असून ती उपमा, दृष्टान्त, विरोधाभास इत्यादि अलंकारांनीं नटलेली आहे. एखाद्या गोष्टीचें वर्णन करतांना तो अशा तऱ्हेचे शब्द वापरतो कीं तो वर्ण्यविषय वाचकांच्या डोळ्यांसमोर उभा राहतो व वाचक त्याच्याशीं रंगून जातो. कांहीं ठिकाणीं मोठ-मोठ्या समासांमुळें त्याची भाषा दुर्बोध वाटते हें जरी खरें असलें तरी एकदां समासाची फोड झाली कीं खडी-साखरेच्या खड्याप्रमाणें ती दुर्बोधता आपोआप विरघळते व वाचकांस वाङ्मयाची अवीट गोडी देते. वर सांगित-लेल्या दोन ग्रन्थांपैकीं 'कादंबरी' या ग्रंथांतील कथा गोष्टी-रूपानें सांगण्याचा एक छोटासा प्रयत्न प्रस्तुत पुस्तिकेंत केला आहे. ही गोष्ट आवडली तर वाचक मूळ ग्रन्थांतील कथा समजावून घेण्याचा प्रयत्न करतील अशी आशा आहे. कारण या 'कादम्बरी' ग्रन्थांत "सुखदुःखाचें करितां मन्थन, समाधान ये रत्न तयांतून" या पद्यपङ्क्तीप्रमाणें मानवी आयुष्यांतील सुखदुःखांच्या घटना अत्यंत कुशलतेनें रंग-विलेल्या आहेत व सुखदुःखाचा अनुभव घेऊन माणूस जर सुखानें हुरळून गेला नाहीं किंवा दुःखानें भांबावला नाहीं तर त्याला शेवटीं समाधान प्राप्त होतें हें आपल्याला ह्या ग्रन्थांत पाहायला मिळतें.

— लेखिका

२०९६३
बालवाङ्मय
८२७
दि. २५।२।५६

# कादम्बरी

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. विदिशा नगरींत शूद्रक नांवाचा एक राजा होऊन गेला. त्याची थोरवी काय वर्णावी! आपल्या पराक्रमानें त्यानें सर्व पृथ्वी जिंकली होती. पृथ्वीवरचा इन्द्रच होता तो. नुसताच पराक्रमी होता असें नव्हे तर तो सर्व चांगल्या गुणांचें माहेरघरच होता. रसिकमंडळी आश्रयाकरितां मोठ्या आशेनें कोणाकडे पाहायची तर ती शूद्रक राजाकडेच. त्यांना तिथें आश्रय हमखास मिळायचाच. धाडसाचीं कामें करण्यांत आघाडीवर कोण असायचा? शूद्रकच. मित्र-मंडळी काव्यशास्त्रविनोदाकरितां कुठें जमायची? शूद्रक राजाकडेच. त्याच्या नांवाचा नुसता उच्चार केला तरी शत्रूंचा थरकांप होत असे. श्रीविष्णूला वामनावतार घेऊन त्रिभुवन जिंकायला पराक्रमाचीं तीन पावलें तरी टाकावीं लागलीं. पण ह्या राजानें पराक्रमाच्या एकाच पावलांत सर्व जग जिंकलें होतें.

त्या राजाच्या राज्यांत लोक अतिशय सुखी होते. त्यांना कसलीच काळजी करावी लागत नसे. चिन्ता असलीच तर ती आपला वेद वगैरेंचा अभ्यास कसा काय होईल ह्याचीच. त्याचें राज्य अगदीं निष्कलंक होतें. काळिमा किंवा डाग कसा तो नव्हताच कुठें. डाग पाहायचा असेल तर चंद्रावरच; किंवा तलवारी आणि चिलखतें

ह्यांवर शत्रूंना जिंकल्यामुळें रक्ताचे डाग पडले असतील तेवढेच. बाकी अगदीं स्वच्छ. सगळीं घरें धनधान्यानें व माणसांनीं खच्चून भरलीं होतीं. रिकामीं घरें दिसायचीं. पण कुठें? बुद्धिबळाच्या पटावर. राज्यांत कशावरहि कधींच कर घेतला जात नसे; कर (हात) घेतला जाई तो फक्त लग्नांतच. अश्रू कधींच ढाळावे लागले नाहींत; सतत चालणाऱ्या होमहवनाच्या धुरामुळेंच फक्त लोकांच्या डोळ्यांतून पाणी येत असे. थोडक्यांत, रामराज्यच होतें तें.

एके दिवशीं सूर्योदयानंतर थोड्याच वेळांत एक चाण्डाळकन्या शूद्रक राजाच्या दरबारांत आली. तिच्या-बरोबर वैशम्पायन नांवाचा एक पोपट होता. ती त्याच्या दर्शनासाठीं अत्यन्त उत्सुक असल्याचें त्याला कळविण्यांत आलें. तिचा यथायोग्य सत्कार करण्याची आपल्या नोक-रांना राजानें आज्ञा केली. योग्य वेळीं त्यानें पोपटाला घेऊन तिला दरबारांत बोलाविलें. त्या पोपटाला सर्व कलांचें, शास्त्रांचें, राजनीतीचें व पूर्वजन्माचें ज्ञान होतें. राजापुढें त्याचा पिंजरा आणून ठेवल्यावर त्यानें राज-स्तुतिपर एक श्लोक म्हटला. अगोदरच चाण्डाळकन्येच्या सौंदर्यानें आश्चर्यचकित झालेला राजा त्या पोपटाचे स्पष्ट उच्चार व मधुर वाणी ऐकून अधिकच विस्मित झाला. दरबारांतील लोकांनाहि त्याच्याविषयीं आणखी कुतूहल वाटूं लागलें. ते त्याचा वृत्तान्त ऐकण्यास आतुर झाले. त्यांना तो कोणीतरी दैवी पक्षी आहे असें वाटूं लागलें. राजानें पोपटाला त्याचा वृत्तान्त सांगण्याची विनंति केली.

पोपटानें वृत्तान्त सांगितला तो असा: मध्यप्रदेशांत

जिथें ऋषि मुनि राहातात असा एक विन्ध्यप्रदेश आहे. त्या प्रदेशांत दण्डकारण्य नांवाचें एक अरण्य आहे. त्या अरण्यांत भगवान् अगस्ति ऋषींचा आश्रम आहे. ह्या आश्रमापासून थोड्याच अंतरावर कमळांनीं सुशोभित झालेलें पम्पा नांवाचें सरोवर आहे. त्याच्या पश्चिमतीरावर अतिशय जुना, विशाल व दण्डकारण्याचा राजाच शोभणारा असा शाल्मलीवृक्ष आहे. त्या झाडाच्या फांद्याफांद्यांमधून व पोकळीपोकळींतून शेकडों वर्षें पोपटांचीं असंख्य कुळें आपलीं हजारों घरटीं बांधून निर्भयपणें राहात होतीं.

त्या झाडाच्या एका जुनाट ढोलींत माझे वडील माझ्या आईसह राहात होते. त्यांच्या म्हातारपणीं मोठ्या सुदैवानें मी जन्मलों. परंतु माझ्या जन्माबरोबरच माझी आई मरण पावली. माझ्या वडिलांनीं आपला सर्व शोक आवरून माझ्या पालनपोषणांत स्वतःचें मन गुंतविलें. स्वतः म्हातारे असल्यामुळें ते उडण्यास समर्थ नव्हते. म्हणून तिथेंच दुसऱ्या पक्ष्यांच्या घरट्यांतून पडलेले धान्याचे कण व फळांचे तुकडे आपल्या कमजोर झालेल्या चोंचींत गोळा करून ते मला भरवीत असत. मी खाऊन उरलेल्यांवर त्यांचें खाणें होत असे.

एके दिवशीं एक भिल्लांची टोळी पहांटेच्या वेळीं शिकार करण्याकरितां त्या अरण्यांत आली. बऱ्याच पशूंची शिकार झाल्यावर ती टोळी निघून गेली. पण त्यांच्यापैकींच एक भिल्ल मागें रेंगाळत राहिला. त्याला कांहींच शिकार मिळाली नव्हती. म्हणून शिकार मिळविण्याकरितां

तो इकडे तिकडे पाहात होता. त्यानें जेव्हां आमच्या झाडाकडे पाहिलें तेव्हां तो आम्हांला प्रत्यक्ष यमच वाटला. झालें! एकदां आमच्यावर त्या काळाची नजर गेल्यावर तो काय सोडतो आम्हांला! झपाझप झाडावर चढला व त्यानें आपल्या राक्षसी कृत्याला सुरुवात केली. झाडाचीं फळें तोडावीं त्याप्रमाणें फांदीफांदींतून हात घालून पक्ष्यांना बाहेर काढून त्यांच्या माना मुरगळून झाडाखालीं टाकून देण्याचा सपाटा सुरू केला त्यानें. करतां करतां माझ्या वडिलांवर धाड आली. माझ्या वडिलांनीं आपल्या पंखाखालीं कुशींत मला अगदीं घट्ट धरून ठेवलें होतें. त्यांचीहि जी व्हायची तीच स्थिति झाली. मीसुद्धां माझ्या वडिलांबरोबर खालीं फेंकला गेलों. माझ्या सुदैवानें म्हणा किंवा दुर्दैवानें म्हणा, किंवा माझें आयुष्य शिल्लक होतें म्हणून म्हणा पण मी मेलों नाहीं. मेलेल्या पक्ष्यांना गोळा करून तो भिल्ल निघून गेला. माझ्या आयुष्याची दोरी बळकट असल्यामुळें मी त्याच्या नजरेंतून सुटलों. आयुष्याच्या बळकटीमुळेंच मी तेथून स्नानाकरितां जाणाऱ्या एका ऋषिकुमाराच्या दृष्टीस पडलों. त्यानें दयेनें मला उचलून घेतलें व पाणी पाजलें. मी थोडासा ताजातवाना झाल्यावर मला त्यानें एका आश्रमांत नेलें. तो आश्रम भगवान् जाबालींचा असून तो ऋषिकुमार त्यांचा हारीत नांवाचा मुलगा होता. भगवान् जाबालींनीं माझ्याकडे पाहातांच 'हा आपल्या पूर्वजन्माच्या वाईट कर्माचें फळ भोगीत आहे' असें म्हटलें. हें ऐकतांच वेदाभ्यासासाठीं जमलेल्या ऋषिकुमारांना माझ्याविषयीं कुतूहल निर्माण झालें. त्यांनीं माझा पूर्ववृत्तान्त सांगण्यास जाबालींना विनंति केली.

भगवान् जाबालींनीं गोष्ट सांगण्यास सुरुवात केली : अवन्ति देशांत उज्जयिनी नांवाची एक प्रसिद्ध नगरी आहे. निसर्गानें उदार हातानें तिला सौंदर्य बहाल केलें आहेच, पण तिला आणखी सुंदर बनविण्यांत तेथील नागरिकांचे-सुद्धां हात लागले आहेत. दुसरें नंदनवनच जणु काय तेथें अवतरलें होतें. म्हणूनच कीं काय भगवान् शंकर आपल्या अत्यन्त आवडत्या अशा कैलासावर राहावयाचें सोडून देऊन येथें राहूं लागले होते. त्या नगरींतून क्षिप्रा नदी वाहात आहे.

त्या उज्जयिनींत एक राजा राज्य करीत होता. तो पराक्रमी होताच पण त्याशिवाय तो सुस्वभावी, गुणवान् व विद्वान् होता. प्रजेची पीडा नाहींशी करण्यांतच दंग असणाऱ्या त्या राजाचें नांव होतें तारापीड. त्यानें आपल्या बाहूंच्या जोरावर सर्व पृथ्वी जिंकली होती. त्याच्या पट्टराणीचें नांव होतें विलासवती. ती त्याला अनुरूप अशीच होती. शुकनास नांवाचा त्याचा एक बालमित्र होता. तोच त्याचा विश्वासू मंत्री होता. त्याच्यावर राज्य-कारभार सोंपवून राजा तारापीड जीवनांतील आनंद भोगूं लागला. शुकनाससुद्धां पूर्ण हुशारीनें राज्यकारभार पाहात होता. त्याच्या पत्नीचें नांव होतें मनोरमा.

मोठ्या आनंदांत काळ चालला होता त्या राजाचा. सुखाची परमावधि झाली होती. त्या सर्व सुखांत एकच गोष्ट प्रामुख्यानें खटकत होती त्याला व त्याच्या राणीला. ती गोष्ट म्हणजे त्यांना मूलबाळ नव्हतें हीच. त्या उणीवे-मुळेंच जसजसें तारुण्य जाऊं लागलें तसातसा त्यांना सर्व

सुखाचा वीट येऊं लागला. राणी विलासवती पुत्रलाभासाठीं अनेक व्रतें करीत होती, पण कांहींच उपयोग होत नव्हता. त्यामुळें ती नेहमीं दुःखी असायची. त्यांत भर म्हणूनच कीं काय एके दिवशीं ती शंकराच्या देवळांत पूजेला गेलेली असतांना तेथें चाललेल्या कथेंत 'ज्याला पुत्र नाहीं त्याला स्वर्गाचें दार मोकळें नाहीं. मुलगा आपल्या आईवडिलांचें घोर नरकापासून रक्षण करतो' असें तिनें ऐकलें. तें ऐकल्यावर तर ती फारच उदासीन झाली. राजवाडयांत परत आल्यावर तिनें आपलीं उंची वस्त्रें व दागदागिने काढून ठेवले. साध्या पोशाखांत राहायचें ठरविलें. खाणेंपिणें सोडून दिलें. म्हाताऱ्याकोताऱ्या बायकांनासुद्धां तिची समजूत कशी करावी तें समजेना.

एकदां विलासवती अशीच शोक करीत असतांना राजा तारापीड तिच्या महालांत गेला. त्याला पाहिल्यावर तिला आणखी हुंदके येऊं लागले. राजानें नानापरीनें तिला विचारून पाहिलें पण तिच्याकडून शोकाचें कारणच समजेना. शेवटीं तिच्या एका दासीनें तें कारण सांगितलें. तें ऐकल्यावर राजालाहि दुःख झालें. पण तें मनांतल्या मनांत ठेवून तो तिची मोठ्या प्रेमानें समजूत घालूं लागला. तो म्हणाला, "देवी, दैवावर सर्व गोष्टी अवलंबून असतात. तिथें आपण पामर काय करूं शकणार! तूं तुझा शोक आवर. देवतांची आपल्यावर कृपा नाहीं असेंच आपण समजूं. गेल्या जन्मीं आपल्या हातून पुण्य घडलें नसेल आणि म्हणूनच आपल्याला ह्या जन्मीं पुत्रलाभाचें सुख मिळत नाहीं. तरी पण आपण अगदींच निराश होतां कामा

नये. आपलें नशीब केव्हां ना केव्हांतरी उघडेलच. देवाला आपली दया येईलच. म्हणून आपल्या हातांत जेवढें आहे तेवढें आपण करूं या. तूं मनोभावें ईश्वराची पूजा कर. गुरूंच्या व वडील माणसांच्या सेवेंत मन गुंतव. एक दिवस असा येईल कीं आपले मनोरथ त्या दिवशीं पूर्ण होतील. माझा मुलगा माझ्या मांडीवर कधीं खेळूं लागेल व त्याच्या धुळीनें माखलेल्या अंगानें माझेहि कपडे कधीं मळतील असें मलासुद्धां झालें आहे. पण काय करणार? धीर धरला पाहिजे." अशा तऱ्हेनें तिची समजून घालून राजा आपल्या उद्योगाला निघून गेला.

त्या दिवसापासून राणी विलासवती राजानें सांगितल्याप्रमाणें वागूं लागली. तिचा बराचसा वेळ शिवमंदिरांत देवपूजनांत जाऊं लागला. गुरुजनांची सेवा ती अत्यन्त आवडीनें करूं लागली. तिच्या मनाला एक प्रकारचें समाधान वाटूं लागलें.

असाच कांहीं काळ लोटल्यावर राजा तारापीडाला पहांटेच्या वेळीं एक स्वप्न पडलें. आपली राणी राजवाड्याच्या गच्चीवर असून तिच्या मुखांत चंद्र प्रवेश करीत असल्याचें त्या स्वप्नांत त्याला दिसलें. सकाळीं उठल्याबरोबर शुकनासाला बोलावून त्याला राजानें आपलें स्वप्न सांगितलें. तें ऐकल्यावर शुकनासाला खूप आनंद झाला. "पहांटें पडलेलें स्वप्न नेहमीं खरें होत असतें. त्यांत हें स्वप्न म्हणजे शुभशकूनच. आपल्याला पुत्रलाभ होणार." असें शुकनासानें राजाला सांगितलें. शुकनासालाहि त्याच दिवशीं स्वप्न पडलेलें असतें, त्यांत एका

शुभ्र वस्त्र धारण करणाऱ्या ब्राह्मणानें चन्द्रकलेप्रमाणें असणारें एक कमळ मनोरमेच्या मांडीवर ठेवतांना त्यानें पाहिलें. त्याहि स्वप्नाचा अर्थ पुत्ररत्न होणार असाच निघत होता. आपल्याप्रमाणें आपला बालमित्र शुकनास याचेंहि भाग्य उघडणार हें पाहून राजाचा आनंद दुप्पट झाला.

स्वप्नें खरीं ठरण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं. राणी विलासवती आणि मंत्रीपत्नी मनोरमा माता होणार असल्याचीं स्पष्ट लक्षणें दिसूं लागलीं. आपल्या आशा आकांक्षा आतां पुऱ्या होणार ह्या आनन्दानें व समाधानानें विलासवतीचा आधींच मोहक असलेला चेहरा आणखी तेजाळला. तिचा आनन्द गगनांत मावेना.

एका शुभ दिवशीं सुमुहूर्तावर विलासवतीनें एका भाग्यशाली मुलाला जन्म दिला. त्या वेळीं राजा व मंत्री शुकनास राजभवनांत गप्पागोष्टी करीत बसले होते. इतक्यांत एक दासी लगबगीनें राजाजवळ आली. मोठ्या खुशींत दिसत होती ती. राजाला पुत्र झाल्याची शुभवार्ता तिनें सांगितली. ती बातमी ऐकल्यावर राजाला इतका आनन्द झाला कीं त्या भरांत त्यानें आपला अति मौल्यवान् हार त्या दासीला बक्षीस दिला. पुत्रजन्माचा आनन्द अपूर्वच असतो नाहीं तरी ! राजाला मुलगा झाल्याची बातमी हां हां म्हणतां सबंध राज्यांत पसरली. मग काय विचारतां! जिकडे तिकडे आनन्दीआनन्द, झगमगाट, गुढ्या तोरणें.

राजा शुकनासाला घेऊन विलासवतीच्या महालांत गेला. पुत्रदर्शन होतांच तो आनन्दानें बेभान झाला. एक म्हणजे पुत्रलाभाचा आनन्द. त्यांत पुष्कळ काळाच्या तप-

श्चर्येनंतर मिळालेला हा आनंद. त्यांत विशेष म्हणजे मुलगा सुलक्षणी. त्यांतच चन्द्रासारखें त्या मुलाचें तेज. अशा सर्व गोष्टी एकत्र आल्यावर कां त्या राजानें बेभान होऊं नये! त्यांतच गंमत म्हणा किंवा योगायोग म्हणा कीं ते दोघे तिथें महालांत असतांनाच शुकनासालाहि मुलगा झाल्याची आनंदाची बातमी येऊन थडकली. त्या दोन मित्रांच्या आनंदाला मर्यादाच राहिली नाहीं. योग्य वेळीं चांगल्या मुहूर्तावर त्या मुलांचें बारसें करण्यांत आलें. राजाच्या मुलाचें नांव चंद्रापीड व शुकनासाच्या मुलाचें नांव वैशंपायन ठेवण्यांत आलें. आपल्या बाललीलांनीं त्या दोन्ही मुलांनीं आप्तेष्टांना व प्रजेला मोहून टाकलें होतें. सिंहाचे छावेच होते ते दोघे. सर्वांच्याकडून कौतुक करून घेत घेत ती जोडी वाढूं लागली.

शिक्षणाकरतां मुलांना दूर ठेवण्याची वेळ जवळ आली. प्रत्यक्ष राजपुत्राचें शिक्षण तें ! मग काय ! शिक्षणासाठीं एक भव्य व सुन्दर विद्यालय बांधण्यांत आलें. कोठें ? तर क्षिप्रा नदीच्या अतिरमणीय तीरावर. कांहीं काळ आपलीं मुलें आपल्यापासून दूर होणार म्हणून दोघांच्या मातापित्यांना फार दुःख झालें. पण मुलांच्या भावी उज्ज्वल काळाकडे लक्ष देऊन त्यांनीं आपलें दुःख आवरलें. त्या विद्यालयांत शस्त्र, शास्त्र, शारीरिक व्यायाम व इतरहि पुष्कळ कलांचें शिक्षण देण्याची सोय केली होती. विद्वान् गुरूंची नेमणूक करण्यांत आली होती. विद्वान् गुरु व तल्लख बुद्धीचे शिष्य असा तो समसमां योग झाला होता. राजकुमाराची बुद्धि म्हणजे प्रत्यक्ष

आरसाच. कोणत्याहि शास्त्राचें किंवा कलेचें प्रतिबिंब त्यांत ताबडतोब स्पष्ट पडत असे. त्यानें कांहींहि शिकायचें शिल्लक ठेवलें नाहीं. शास्त्र, राजनीति, व्यायाम, संगीत, साहित्य किंवा शस्त्रास्त्र कांहींहि घ्या त्यांत त्याच्या बुद्धीचें तेज प्रखर दिसायचें.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर गुरूंनीं दोघांहि कुमारांना घरीं जाण्याची परवानगी दिली. मग राजानें आपल्या बलाहक नांवाच्या सेनापतीला चंद्रापीडाला आणण्याकरितां मोठ्या लवाजम्यासह पाठविलें. इराणच्या राजानें इन्द्रायुध नांवाचा एक सुन्दर व अत्यंत वेगवान घोडा राजाला भेट म्हणून पाठविला होता. तो त्यानें चंद्रापीडाकरितां बलाहकाबरोबर मुद्दाम दिला. बलाहकानें महाराजांचा निरोप राजपुत्राला सांगितला, "कुमार, आमचे मनोरथ पूर्ण झाले. आपण सर्व शास्त्रांचा व कलांचा अभ्यास पूर्ण केला आहे, इतकेंच नव्हे तर आपण त्यांत उत्तम यश मिळविलें आहे. आपल्याला आपल्या आचार्यांनीं घरीं जाण्याची परवानगी दिली आहे. तरी आतां आपल्या दर्शनानें लोकांच्या डोळ्यांचें पारणें फिटूं दे. आपली आई आपल्याला भेटण्यास आतुर झाली आहे. तिला आपल्या भेटीनें सुखवा. राज्यसुखाचा अनुभव घ्या." असा तो निरोप होता.

चंद्रापीड आणि वैशंपायन नगरांत आले. रस्त्याच्या दोन्ही बाजूस तमाम गर्दी जमली होती. मंगलवाद्यें वाजत होतीं. स्त्रिया मंगल गीतें गात होत्या. अशा थाटांत राजकुमार वैशंपायनाला बरोबर घेऊन आपल्या पित्याजवळ येऊन पोहोंचला. पित्याच्या चरणांना स्पर्श करून त्यानें

अभिवादन केलें. पिता–पुत्र भेट होती ती! तिचा अनुभव घ्यावा लागतो. तिचें शब्दांत वर्णन करणें शक्यच होणार नाहीं. नन्तर तिथून तो आपल्या आईच्या भेटीला गेला. आई म्हणजे वात्सल्यमूर्तिच ती! तिनें मुलाची दृष्ट काढली. मुलगा कसाहि असला तरी प्रत्येक आईला कौतुकच असतें. मग इथें तर काय! चन्द्रापीड हुशार आणि तेजस्वी. "इतक्या कोंवळ्या वयांत किती किती रे शिकलास! किती रे तुझें धैर्य! गुरूंच्यावरची तुझी भक्ति तरी किती अलोट!" वगैरे कौतुकाचा नुसता त्याच्यावर पाऊसच पडत होता.

तिथून चंद्रापीड व वैशंपायन शुकनासाच्या भेटीला गेले. शुकनासानें त्या दोघांना गाढ आलिंगन दिलें. तिथेंहि पिता-पुत्र व माय-लेकरें यांच्या भेटी झाल्या.

दुसरे दिवशीं स्नान वगैरे आटोपून चन्द्रापीड आपल्या महालांत बसलेला असतांना कैलास नांवाचा अंतःपुरांतील एक सेवक त्याच्याकडे आला. एका अत्यन्त रूपवती मुलीला घेऊन तो आलेला होता. तो म्हणाला, " राणीसरकारांचा आपल्याला निरोप आहे. कुलूतराजाला जिंकून महाराजांनीं त्याच्या मुलीला इतर बन्दी लोकांच्या बरोबर आणलें. तेव्हांपासून ती माझ्या महालांत सेविकेचें काम करीत आहे. पण मी मात्र तिचें मुलीप्रमाणें पालनपोषण केलें आहे. मुलीचें नांव पत्रलेखा. आतां ह्यापुढें ती आपलें तांबूलवाहिनीचें ( पानदान वाहण्याचें) काम करील. तिच्याशीं कुमारांनीं प्रेमानें वागावें. सामान्य सेविकेची वागणूक तिला देऊं नये. ती आपली शिष्या आहे

असें समजावें." हा निरोप सांगितल्यावर कैलास चंद्रापीडाला अभिवादन करून निघून गेला. चंद्रापीडाचें दर्शन झाल्यापासून पत्रलेखेला त्याच्याविषयीं विलक्षण आदर वाटूं लागला. सांवलीप्रमाणें ती त्याच्या आसपास सतत असे. चंद्रापीडावरहि तिच्या गुणांचा व सेवेचा विशेष प्रभाव पडला.

कांहीं दिवसानंतर राजकुमार चंद्रापीडाचा राज्याभिषेक समारंभ मोठ्या थाटांत झाला. तो थाट व तें वैभव पाहून स्वर्गांत प्रत्यक्ष इंद्राचेंहि डोळे दिपले असतील! जिकडे तिकडे रोषणाई आणि आतषबाजी. दुसरें नांवच नाहीं

राज्यभिषेकानंतर दिग्विजयाला निघण्यापूर्वी चंद्रापीड शुकनासाला भेटायला गेला. त्या वेळीं शुकनासानें जो उपदेश केला तो अमोल तर होताच पण चिरंतन काळाला लागू पडणारा असाच होता. शुकनास म्हणाला, "कुमार, आपण सर्व शास्त्रकलांचा अभ्यास उत्तम तऱ्हेनें केला आहे. आदर्श राजाला लागणारे सर्व आदर्श गुण आपल्या ठिकाणीं आहेत. आतां मी आपल्याला आणखी काय शिकवणार ? पण राहवत नाहीं. निदान धोक्याच्या सूचना तरी द्याव्या असें वाटतें. कुमार, जन्मजात वैभव, त्यांत तारुण्य, त्यांत अप्रतिम असें रूप आणि त्यांतच अलौकिक शक्ति ह्या सर्व गोष्टींना योग्य वळण लागलें नाहीं तर ह्यांतील एकेक गोष्ट सुद्धां नाशाला कारण होते तर मग ह्या गोष्टी एकत्र आल्या तर किती अनर्थ होईल ! तरी ह्या सर्व गोष्टींना योग्य मार्गानें न्या. राजलक्ष्मीमुळेंच पुष्कळसे अनर्थ उद्भवतात. लक्ष्मी चंचल आहे. ओळखबिळख ती जाणीत नाहीं. तिचें पाऊल

कुठेंहि स्थिर नसतें. आज इथें तर उद्यां तिथें. तिच्यामुळें माणसाला जो कैफ चढतो तो फार वाईट असतो. त्या धुंदीपासून दूर रहा. लक्ष्मीच्या आहारीं न जातां तिला आपण आपल्या ताब्यांत ठेवा. राज्यकारभार अतिशय मोहांत पाडणारा आहे. तेव्हां, कुमार, अशा तऱ्हेनें वागा कीं प्रजा आपल्याला हंसणार नाहीं, मित्रमंडळींना चेष्टा करायला वाव मिळणार नाहीं, विद्वानांना निंदा करायला जागा राहणार नाहीं, शत्रू नमल्याशिवाय राहाणार नाहींत व बान्धवांचाहि उत्कर्ष झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

राज्याभिषेक झाल्यानंतर थोडयाच दिवसांनीं चंद्रापीड आपल्या आवडत्या इंद्रायुधावर स्वार होऊन दिग्विजया-साठीं निघाला. वैशंपायन, पत्रलेखा व पुष्कळसें सैन्यहि बरोबर होतें. उत्साहानें वातावरण भरून गेलें होतें. स्वाऱ्या करीत करीत पृथ्वीला प्रदक्षिणा घालीत कैलास पर्वताजवळ असलेल्या हेमजट नांवाच्या नगरीकडे चंद्रापीड आला. भिल्लांची ती सुवर्णपुरी होती. भिल्लांना त्यानें जिंकलें. तिथेंच छावणी ठेवून कांहीं दिवस राहा-ण्याचा त्यानें विचार केला. दुसऱ्या दिवशीं इंद्रायुधाला घेऊन तो शिकारीकरितां निघाला. खूप लांब गेल्यावर एका झाडींतून किन्नरांची एक जोडी बाहेर पडलेली त्यानें पाहिली. ते किन्नर त्याला फार आवडले. त्यांना पकडण्या-करितां चंद्रापीड इंद्रायुधावर स्वार होऊन निघाला. इंद्रायुध भरधांव निघाला होता. पण त्यापेक्षां किन्नरांचा वेग जास्त होता. पळण्याची शर्यतच लागली होती. आतां धरूं, आतां धरूं, आतां धरलेंच असें वाटायचें आणि क्षणा-

र्धांत ती किन्नर जोडी कोठल्या कोठें निघून जायची. असा पाठलाग करीत चंद्रापीड पर्वताच्या शिखरावर गेला. इंद्रायुधहि धांपा टाकूं लागला. चंद्रापीड तर खूपच थकून गेला होता. शेवटीं त्या किन्नरांचा त्यानें नाद सोडून दिला. मागें फिरण्याशिवाय दुसरा उपायच नव्हता. पण मार्ग सांपडेना. कंटाळून एका वृक्षाच्या दाट छायेंत तो बसला. थोडचा वेळानें त्याला तहान लागली. इंद्रायुधाला घेऊन तो पाण्याच्या शोधार्थ निघाला. थोडें दूर गेल्यावर त्याला एक सरोवर दिसलें. किती रमणीय होतें तें ! झालेल्या श्रमांचा विसर पडला चंद्रापीडाला. श्रमांचा शेवट गोड झाला असेंच त्याला वाटूं लागलें. सरोवराचें पाणी म्हणजे अमृतच. आपल्या डोळ्यांनीं आतांपर्यंत असलें स्वच्छ पाणी कधींच पाहिलें नव्हतें, आपल्या जिभेनें अशा अमृततुल्य पाण्याचा पूर्वी कधींच आस्वाद घेतला नव्हता, इतकेंच नव्हें तर तिथल्या कमळांच्या सुगंधासारखा सुगंधसुद्धां आपल्या नाकानें त्या वेळेपर्यंत कधींहि अनुभवला नव्हता किंवा तेथील हंसांच्या मधुर आवाजासारखा आवाजहि ऐकण्याचें भाग्य आपल्या कानांना कधींहि लाभलें नव्हतें असेंच त्याला वाटूं लागलें. आकंठ पाणी पिऊन झाल्यावर तो तिथेंच शीतल छायेंत एका दगडावर बसला. तेवढचांत उत्तर दिशेच्या बाजूनें त्याला वीणेचे मधुर सूर ऐकूं आले. स्वर्गीय सूर वाटले ते. त्या सुरांची मोहिनी पडली त्याच्यावर. मृत्युलोकावर असले सूर कोठून ! असा प्रश्न त्याला पडला. इंद्रायुधावर स्वार होऊन तो त्या दिशेनें निघाला. दौडत दौडत कांहीं अंतर गेल्यावर त्याला

एक शंकराचें देऊळ आढळलें. त्याच देवळांतून संगीताचे सूर येत होते. अर्थातच चंद्रापीडानें शंकराच्या देवळांत प्रवेश केला. तिथें शिवमूर्तीपुढें एक युवती बसलेली त्याला दिसली. तिच्या हातांत वीणा असून ती शिवाला आळ-वीत होती. सुमारें १७–१८ वर्षांची असावी ती. तिच्या वेषभूषेवरून ती कोणीतरी तपस्विनी असावी असें वाटत होतें. राजवैभव भोगण्यास योग्य असणाऱ्या ह्या तरुणीनें हें तपस्विनीचें खडतर व्रत कां स्वीकारलें असावें ह्याबद्दल चंद्रापीडाला जिज्ञासा वाटूं लागली. म्हणून तिची ओळख व्हावी ह्या हेतूनें शंकराचें दर्शन घेतल्यावर तो तिथेंच एका खांबापाशीं बसून राहिला.

थोड्या वेळानें त्या तपस्विनीचें वीणावादन संपलें. ती देवळांतून बाहेर पडणार इतक्यांत तिची तीर्थासारखी पवित्र दृष्टि त्या राजकुमाराकडे गेली. तिनें त्याचें स्वागत केलें व पाहुणचाराकरितां त्याला आपल्या मठांत बोला-विलें. त्यानेंहि तिला आदरानें नमस्कार केला व एखाद्या विनयशील शिष्याप्रमाणें तो तिच्या मागून जाऊं लागला. तिची कृपादृष्टि आपल्याकडे वळली इतकेंच नव्हे तर तिनें आपल्याला मठांत बोलाविलें ह्यांतच राजकुमाराला धन्यता वाटूं लागली; तिची हकीगतहि आपल्याला ऐकायला मिळेल अशी आशाहि वाटूं लागली. तिनें त्याला आपल्या साध्यासुध्या पण निसर्गरम्य मठांत नेलें. तिनें स्वतः तोडून आणून दिलेलीं कंद-मुळें-फळें त्याला फार गोड वाटलीं.

यथेच्छ फलहार झाल्यावर इकडच्या तिकडच्या गप्पा सुरू झाल्या. शेवटीं तिची ओळख करून घेण्याची आपली

इच्छा त्यानें तिला बोलून दाखविली. आपली करुण कहाणी सांगण्याचें शक्यतों ती टाळीत असे. पण त्याला पाहिल्यापासून तिला त्याच्याविषयीं एक प्रकारचा आदर व विश्वास वाटूं लागला होता. म्हणून त्याला मात्र आपली कहाणी सांगण्याचें तिनें ठरविलें. एक दीर्घ निःश्वास सोडून ती सांगूं लागली.

"गंधर्वांच्या कुळांत माझा जन्म झाला. माझें नांव महाश्वेता आहे. माझ्या वडिलांचें नांव हंस. माझ्या आईचें नांव गौरी. राजवैभवांत वाढत होतें मी. मला जमिनीचा स्पर्शच होत नसे. वीणेप्रमाणें एकाच्या मांडीवरून दुसऱ्याच्या मांडीवर मला दिलें जात असे. हळु हळु मी तारुण्यांत पदार्पण केलें. एकदां वसंत ऋतूंत मी माझ्या आईबरोबर इथल्या अच्छोद सरोवरावर स्नानाकरितां गेलें होतें. सरोवराच्या आसपासच्या वनश्रींत वसंत सर्वत्र बहरला होता. माझ्या मैत्रिणींबरोबर तिथें भटकण्यांतच मला मौज वाटत होती. इतक्यांत दुरून कोठून तरी वाऱ्याबरोबर फुलांचा दिव्य सुगंध आला. मला तर त्या वासानें मोहून टाकलें. आपोआपच त्या वासाच्या दिशेनें पावलें पुढें पडूं लागलीं. थोडेसें पुढें गेल्यावर मी एका अति तेजस्वी मुनिकुमाराला पाहिलें. त्या मुनिकुमारानें आपल्या कानांवर फुलांचा एक तुरा ठेवला होता व त्याच फुलांचा तो दिव्य सुगंध येत होता. तो मुनिकुमार आपल्या मित्राबरोबर स्नानाला चालला होता. त्या मित्राचें नांव कपिञ्जल होतें हें नंतर मला कळलें. एवढा वेळ त्या नुसत्या सुगन्धानेंच मी मोहून गेलें होतें. पण आतां त्या मुनि-

ग्रा. क्र. ५४५८६ (२१)

कुमारांच्या अतिमनोहर लावण्यानें मला पूर्णपणें वेडावून टाकलें होतें. त्यांच्याविषयीं मला विलक्षण ओढ वाटूं लागली. मी त्यांच्याजवळ जाऊन त्यांना प्रणाम केला. त्यांनाहि माझ्याविषयीं आकर्षण वाटूं लागलें असावें असें दिसलें. त्यांच्या हातांतील रुद्राक्षाची माळसुद्धां त्यांच्या मनांत चाललेल्या गोंधळाची साक्ष देऊं लागली. ती एक सारखी थरथर हालूं लागली. मदनानें त्यांना पूर्ण जिंकलें होतें त्यांचा मित्र कपिञ्जल त्यालाहि मी नमस्कार केला व त्या मुनिकुमारांविषयीं माहिती विचारली. माहिती कळली ती थोडक्यांत अशी : 'स्वर्गांत राहाणारे मुनिश्रेष्ठ श्वेतकेतु ते त्यांचे वडील. त्यांची आई लक्ष्मी. उमललेल्या कमळांच्या ताटव्यांत असतांना लक्ष्मीला हा मुलगा झाला म्हणून त्यांचें नांव पुण्डरीक ठेवलें. कारण पुण्डरीक म्हणजे कमळ.' नंतर मी कपिञ्जलाला त्या फुलांविषयीं विचारलें, तेव्हां तो म्हणाला, "समुद्रमंथनाच्या वेळीं समुद्रांतून पारिजातक वृक्ष निघाला. त्याचींच हीं फुलें. आज चतुर्दशी म्हणून शिव-पूजेकरितां आम्हीं निघालों होतों. नंदनवनांतून जात असतांना तेथील वनदेवतेनें हा पारिजातक फुलांचा गुच्छ पुण्डरीकाच्या कानावर विशेष शोभून दिसेल म्हणून तो त्याला अर्पण करण्याची इच्छा दर्शविली. पण आमचा मित्र काय! ऋषिकुमारच तो! झिडकारणार होता तो गुच्छ. पण मीच तो त्याला घ्यायला लावला व बळेंच त्याच्या कानावर ठेवला." इतकें सांगून परत तो मला म्हणाला, "झालें समाधान! हा कोण ? कोणाचा ? ह्याच्या कानावर हें काय आहे ? तें कोठून आलें ? वगैरे प्रश्न संपले ना ?"

मला तो गुच्छ आवडला आहे हें पाहून पुण्डरीकांनीं तो आपल्या कानावरून काढून स्वतःच्या हातानें माझ्या कानावर ठेवला. नुसत्या स्पर्शानें सुद्धां उभयतांचा अनुराग स्पष्ट झाला. पुण्डरीक तर इतके कावरेबावरे झाले कीं हातांतील रुद्राक्षमाळ केव्हां गळून पडली तेंच त्यांना समजलें नाहीं. ती माळ पडत असतांनाच मी झेलली व गळ्यांत घालून स्नानाकरितां तिथून जाऊं लागलें.

पुण्डरीकांची ती अवस्था पाहून कपिञ्जल त्यांना म्हणाला, " मित्रा पुण्डरीका, काय ही तुझी अवस्था ! हें तुला शोभत नाहीं. तुझें तें धैर्य कोठें गेलें ? ऐहिक सुखाविषयींचा तुझा तिटकारा कोठें गेला ? गुरूंचा उपदेश कोठें गेला ? आज तुझी विद्वत्ता, तुझें शहाणपण, तुझें ज्ञान सगळें वायां गेलें. रुद्राक्षाची माळ गळून पडलेली सुद्धां तुझ्या लक्षांत येऊं नये ना ! आतां ती जी गेली ती गेलीच समज. तुझें हृदयहि चोरीला जाण्याच्या बेतांत आहे. तें तरी सांभाळ. " हें ऐकून पुण्डरीक शुद्धीवर आले. त्यांना आपल्या वागण्याची लाज वाटूं लागली. ते म्हणाले, " त्या युवतीनें माझी माळ नेली आहे. तिला मी कधींहि क्षमा करणार नाहीं." त्यांनीं मला जात असतांना पाहिलेंच होतें. मला मागें फिरण्यास त्यांनीं सांगितलें. मीहि परत फिरलें पण त्यांची माळ देण्याऐवजीं चुकून मी माझा मोत्याचा हार त्यांना दिला. ते तरी शुद्धीवर कोठें होते ! आपलीच माळ आहे असें समजून ते तो हार घेऊन निघून गेले. मीहि घरीं परतलें. पुण्डरीकांची भेट झाल्यापासून मी त्यांना क्षणभरहि विसरूं शकत नव्हतें. उठतां बसतां त्यांचेंच चिंतन

चाले. एकदां पुण्डरीकांच्या कडून मला पत्र आलें. "हंस ज्या-प्रमाणें मोत्यांच्या हाराला कमळांचे देठ समजतो व फसतो त्याप्रमाणें मीहि तुझ्या हारामुळें फसलों आहें." असें त्यांत लिहिलेलें होतें. पत्र वाचून मन फारच अस्वस्थ झालें. संध्याकाळीं कपिञ्जल रुद्राक्षमाला नेण्यासाठीं आला. तें नुसतें निमित्तच होतें. खरें म्हणजे पुण्डरीकांची दारुण अवस्थाच माझ्यापुढें त्याला सांगायची होती. ती अवस्था मला ऐकवतच नव्हती. त्यांना वांचविण्याचा एकच उपाय होता व तो म्हणजे मी त्यांना भेटणें हाच. कपिञ्जल त्याच हेतूनें माझ्याकडे आला होता. नंतर तो निघून गेला. खूप विचार केला व शेवटीं मी मनांत एक निश्चय ठाम केला. पुण्डरीकांचे प्राण कांहींहि झालें तरी वांचवायचेच. लोक-निंदेची पर्वा न करतां मी माझ्या तरलिका नांवाच्या दासीला बरोबर घेऊन निघालें. निघतांना माझा उजवा डोळा लवूं लागला. दुश्चिन्ह होतें तें. मी मनांतून अतिशय घाबरलें होतें. सरोवराच्या दिशेनें मी चालूं लागलें. तेव्ह-ढ्यांत एका पुरुषाचा आक्रोश मी ऐकला. तो कपिञ्जलाचाच आवाज होता. आधींच उजवा डोळा लवत होता त्यांत हें रडणें. पुढें काय वाढून ठेवलें आहे याची कल्पना आली. तरी पण मन घट्ट करून सरोवराजवळ असलेल्या लता-मंडपांत गेलें. तिथें काय पाहिलें मी! पुण्डरीकांचें मृत शरीर. मला भोंवळ आली व मी तिथेंच पडलें." हें सांगत असतांना तिला मूर्च्छा येऊं लागली. चंद्रापीडानें तिला सावरून धरलें व तिचें खूप सांत्वन केलें. थोडच्या वेळानें ती शुद्धीवर आली. तिनें आपली कहाणी पुढें सांगण्यास

सुरुवात केली. "मी शुद्धीवर आलें तेव्हां विरहाग्नीच्या यातना भोगण्यापेक्षां प्रत्यक्ष अग्नींत राख झालेलें काय वाईट, असें मनाशीं ठरवून 'सती जाण्याकरितां तूं माझ्यासाठीं एक चिता रच,' असें मी तरलिकेला सांगितलें. इतक्यांत चंद्रमंडळांतून निघून आकाशांतून भूलोकावर उतरलेला एक देदीप्यमान दिव्य महापुरुष मीं पाहिला. त्यानें धीर-गंभीर आवाजांत मला म्हटलें, 'बाळे महाश्वेते, तूं सती जाऊं नकोस. तुझा पुण्डरीक पुन्हां जिवंत होईल.' इतकें म्हणून पुण्डरीकांचें शव घेऊन तो आकाशांत निघून गेला. पुण्डरीकांना कोठें नेत आहेत हें पाहण्यासाठीं कपिञ्जल-सुद्धां त्या महापुरुषाच्या मागोमाग आकाशांत गेला.

तें दृश्य पाहून मला कांहीं सुचेना. त्या महापुरुषाच्या सांगण्याप्रमाणें वागावें असें तरलिकेचें म्हणणें होतें. ती माझी खूप समजूत घालीत होती. मलाहि पटत होतें तिचें म्हणणें. पण मन उदास झालें. वैराग्य आलें होतें मला. ती रात्र तिथेंच शोक करीत तरलिकेसह काढली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून स्नान केलें. त्यांचा तोच कमंडलु, तींच वल्कलें व तीच रुद्राक्षमाला घेऊन संसार असार आहे हें निश्चित ठरवून ब्रह्मचर्यव्रत स्वीकारलें व भगवान् शंकराला शरण जाण्याकरितां इथें शिवालयांत आलें. माझे आईवडील माझा शोध करीत करीत इथें आले होते. मला इथून नेण्यासाठीं खूप प्रयत्न त्यांनीं केला. खूप आर्जवें केलीं. पण माझा निश्चय ठरला तो ठरला. आईवडील नाइलाज होऊन निघून गेले. तेव्हांपासून मी इथेंच आहे. पुण्डरीक जीवंत होतील अशी बळकट आशा आहे. संपली माझी कहाणी."

महाश्वेतेची ती करुण कहाणी ऐकल्यावर चंद्रापीडाला तिच्याविषयीं जास्तच आदर वाटूं लागला. प्रत्यक्ष पार्वतीनें-सुद्धां शंकराच्या प्राप्तीसाठीं इतकें खडतर व्रत केलें नसेल असें त्याला वाटूं लागलें.

ज्या तरलिकेचा महाश्वेतेनें आपल्या कहाणींत उल्लेख केला होता ती तिथें कुठेंच दिसत नव्हती म्हणून चंद्रापीडानें तिची चौकशी केली. कादंबरी नांवाच्या महाश्वेतेच्या बालमैत्रिणीकडे ती गेलेली असल्याचें त्याला महाश्वेतेकडून कळलें. कादंबरीकडे तिला कां पाठविली आहे तें सांगण्यापूर्वीं महाश्वेतेनें कादंबरीचा वृत्तान्त सांगितला.

कादंबरीचा जन्म अमृतापासून उत्पन्न झालेल्या अप्सरांच्या कुळांत झाला. गंधर्वराज, चित्ररथ व मदिरा यांची ती एकुलती एक मुलगी. अतिशय कौतुकांत वाढली होती ती. तिचें लावण्य तर अप्रतिम होतें. ती महाश्वेतेची बालमैत्रीण असून त्यांचें खाणेंपिणें, बसणेंउठणें, बोलणेंचालणें वगैरे सगळें एकत्रच चालत असे. महाश्वेतेची दुःखद वार्ता कळल्यावर तिनें एक प्रतिज्ञा केली होती. महाश्वेता विरहावस्थेंत राहील तोंपर्यंत ती विवाह करणार नव्हती. तिच्या आईवडिलांना चिन्ता वाटूं लागली. त्यांनीं पुष्कळ समजूत घातली तिची. पण व्यर्थ. शेवटीं तिचा हट्ट त्यांनीं महाश्वेतेला कळविला. तिलाहि फार दुःख झालें. तिची समजूत घालण्याकरितां महाश्वेतेनें तरलिकेला पाठविलें होतें.

वृत्तान्त संपला. रात्र झाली. वैशंपायन, पत्रलेखा व आपलें सैन्य यांचा विचार करतां करतां चंद्रापीडाला झोंप

लागली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं एका युवकाबरोबर तरलिका आली. युवकाचें नांव होतें केयूरक. त्यानें कादंबरीची अवस्था वर्णन केली व तिच्या आईवडिलांचा निरोप सांगितला. महाश्वेतेनें स्वत: कादंबरीकडे जाण्याचें ठरविलें. चंद्रापीडालाहि तिनें आपल्याबरोबर चलण्याचा आग्रह केला. त्यानें ताबडतोब अनुमति दिली. दोघेंहि गंधर्व नगरीकडे निघालीं.

तिथें गेल्यावर महाश्वेतेनें कादंबरीची व चंद्रपीडाची ओळख करून दिली. प्रथमदर्शनींच त्यांना एकमेकांविषयीं प्रेम वाटूं लागलें. नंतर कादंबरी व महाश्वेता कादंबरीच्या आईवडिलांना भेटायला गेल्या. कादंबरीनें आपली मुख्य दासी मदलेखा हिच्याकडून चंद्रापीडाला वस्त्रालंकार अर्पण केले. थोडया वेळानें कादंबरी पुन्हां चंद्रापीडाला भेटायला गेली. गप्पागोष्टी सुरू झाल्या. भारत देश, तारापीड, विलासवती, शुकनास, उज्जयिनी नगरी वगैरे त्यांच्या गप्पांचे विषय होते. नंतर कादंबरी आपल्या महालांत गेली.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच चंद्रापीड कादंबरीला भेटायला गेला. चंद्रापीडाला आपल्या राजधानीस परत जायला कादंबरीकडून परवानगी हवी होती. ती कशी मागावी हाच प्रश्न पडला होता त्याला. महाश्वेता तिथेंच होती. तिनें तें ओळखलें. ती म्हणाली, "राजकुमारांना आपलें सैन्य सोडून आल्याला बरेच दिवस झालेले आहेत. ते दिग्विजयाकरितां निघाले होते. वाटेंत माझ्या आश्रमाला त्यांचे पाय लागले हें मी माझें भाग्य समजतें. माझ्याच विनंतीवरून ते इथेंहि आले. आतां त्यांना जाण्यास परवानगी दे."

कादंबरीनें मोठ्या कष्टानें परवानगी दिली. गत्यंतरच नव्हतें. सर्वांचा निरोप घेऊन चंद्रापीड निघाला व आपल्या छावणींत सुखरूप येऊन पोहोंचला. त्याच्या लोकांना खूप आनंद वाटला. पण एक रात्रसुद्धां लोटली नसेल तेवढ्यांत कादंबरीची स्थिति फार शोचनीय झाली आहे हें सांगण्या-करितां केयूरक तिथें येऊन पोंचला. कादंबरीची विरहव्यथा ऐकल्यावर चंद्रापीडाला दु:ख झालें. वैशंपायनावर पुन्हां एकदां सैन्य सोंपवून पत्रलेखेला घेऊन तो कादंबरीकडे गेला. त्याला पाहून कादंबरीचें मन शांत झालें. तिची समजूत घालून पत्रलेखेला तिच्याजवळ ठेवून तो परत वैशंपायनाकडे गेला.

राजा तारापीड व राणी विलासवती चंद्रापीडाला पाहा-ण्यास फार उत्सुक झालीं होतीं. त्यांना त्याचा दीर्घकाळ वियोग सहन होत नव्हता. एके दिवशीं तारापीडाकडून चंद्रापीडाला पत्र गेलें. त्यांत त्याला राजधानीला त्वरित बोलाविलें होतें. चंद्रापीड कात्रींत सांपडला. एक मन आई-वडिलांच्या वात्सल्यानें ओढलें जात होतें तर दुसरें मन कादंबरीच्या प्रेमानें ओढलें जात होतें. शेवटीं त्या वेळेपुरता तरी आईवडिलांच्या प्रेमाचा विजय झाला. तो उज्जयि-नीला परत गेला. वैशंपायनाला सैन्य घेऊन मागून येण्यास सांगितलें होतें. त्याला सुखरूप आलेला पाहून आईवडि-लांना खूप आनंद झाला. तीनचार दिवसांत पुन्हां कादंबरी

बेचैन झाल्याचा निरोप आला. तो गंधर्वनगरीकडे जाण्यास निघाला. तेवढ्यांत एक बातमी आली कीं, वैशंपायन नाहींसा झाला होता. वाटेंत वैशंपायनाचा शोध लावून पुढें तो गंधर्वनगरीकडे जाणार होता. वाटेंत त्याचें सैन्य त्याला भेटलें. तिथें त्याला कळलें कीं वैशंपायन अच्छोद सरोवराजवळच्या लग्नमंडपांत गेला होता. तिथें त्याचें मन इतकें गुंगून गेलें कीं तो उठायलाच तयार नव्हता. सैन्याला सुद्धां त्याच्या वागण्याचें आश्चर्य वाटलें. पुढें तो कोठें गेला तें मात्र कळलें नाहीं. महाश्वेतेच्या आश्रमांतच तो गेला असावा असा चंद्रापीडानें अंदाज केला. पण तिथें शोध करण्यापूर्वी तो शुकनासाचें सांत्वन करण्याकरितां व त्याला धीर देण्याकरितां आधीं उज्जयिनीला परत आला. वैशंपायन नाहींसा झाल्याचें शुकनासाला कळलेलेंच होतें. दारुण दुःखांत होतीं तीं पति–पत्नी. त्यांना धीर देऊन चंद्रापीड जो तिथून निघाला तो तडक महाश्वेतेकडे आला. बिचारा चंद्रापीड! इथें मित्राचा शोध करायचा तर तिथें कादंबरीला धीर द्यायचा. पण तिथें गेल्यावर दुःख ऐकण्याचेंच त्याच्या नशिबीं होतें. सुखाच्या शिखरावर असलेल्या त्याचा दुःखाच्या दरींत कडेलोट होत होता. महाश्वेता दुःखांतच होती. ती चंद्रापीडाला म्हणाली, "काय सांगूं! माझ्याकडून एक ब्रह्महत्त्या घडली. तुमच्याच वयाचा एक ब्राह्मणकुमार इथें आला व माझ्या

२०९६३

प्रेमाची याचना करूं लागला . . . त्याला मी दुष्ट समजलें व रागाच्या भरांत ‘ तूं पक्षी होशील ’ असा शाप दिला. तो लगेच मरून पडला...माझ्या पापानेंच मी अर्धमेली झाल्यें आहें. तो तुमचा मित्र वैशंपायन हें नंतर मला कळलें.”

तें ऐकल्यावर मित्रवियोगाचें दुःख असह्य होऊन चंद्रापीड तिथल्या तिथेंच गतप्राण झाला.

इथें चंद्रापीड महाश्वेतेकडे असल्याचें पत्रलेखेकडून कळल्यावर कादंबरी पत्रलेखेला घेऊन महाश्वेतेकडे गेली ; पण दुःखच होतें तिच्या वांटयाला. मृत चंद्रापीडाला पाहून ती दुःखानें जवळ जवळ वेडीच झाली. त्याच्या पायावर पडून ती शोक करूं लागली. तिचा स्पर्श होतांच चंद्रापीडाच्या शरीरांतून एक दिव्य ज्योत उत्पन्न झाली आणि त्याच वेळेला आकाशवाणी झाली : ‘बाळे महाश्वेते, तूं जीवंत राहा. प्रियकराबरोबर तुझी भेट होईल. पुण्डरीकाचें शरीर माझ्या तेजावर पोसलें जात आहे व तें सुरक्षित आहे. चंद्रापीडाचेंहि शरीर माझ्या तेजामुळें नाश पावणार नाहीं. तेव्हां शवांचा त्यागहि करूं नका व अंत्यसंस्कार सुद्धां करूं नका. जीवंत होईपर्यंत त्यांचें रक्षण करीत राहा.”

महाश्वतेनें चंद्रापीडानें बरोबर आणलेल्या इंद्रायुधाला पाण्यांत लोटून दिलें. धन्याच्या पश्चात् त्याला तरी जगण्याचा काय अधिकार असें तिचें म्हणणें. पण काय चमत्कार ! घोडा पाण्यांत बुडाला व तपस्वी होऊन बाहेर

आला. तो शापमुक्त झालेला कपिञ्जलच होता. महाश्वेतेनें त्याला ओळखलें. पुण्डरीकाचें शरीर चन्द्रलोकांत सुरक्षित आहे व महाश्वेतेनें ज्या दिव्यपुरुषाला पाहिलें होतें तो चंद्र होता असें कपिञ्जलानें महाश्वेतेला सांगितलें. पुंडरिकाचें नांव ऐकल्यावर महाश्वेतेनें त्याची आणखी विचारपूस केली. तेव्हां कपिञ्जल म्हणाला, "पुंडरीकाला तुझ्या विरहाच्या वेदना असह्य झाल्या. अशा स्थितींत असतांनाच चंद्रोदय झाला. शीतल वाटण्याऐवजीं त्याला जास्तच त्रास होऊं लागला. त्यानें चंद्राला शाप दिला, 'अरे दुष्टा चंद्रा, तूं मला आपल्या किरणांनीं पोळून काढून माझ्यामध्यें अनुराग उत्पन्न करून माझ्या प्रियेचें दर्शन न घडवितांच प्राण हिरावून घेत आहेस, त्या अर्थीं तुलाहि ह्या भारतवर्षांत दोन जन्मीं विरहयातना माझ्यासारख्याच भोगाव्या लागतील.' चंद्राचा बिचाऱ्याचा कांहींच दोष नव्हता. चंद्रहि रागावला व 'माझ्याबरोबर तुलाहि सुखदु:खें भोगावीं लागतील' असा त्यानें शाप दिला. राग निवळल्यावर चंद्राच्या लक्षांत आलें कीं, त्याच्या किरणांपासून उत्पन्न झालेल्या अप्सरांच्या कुळांत जन्मलेल्या गौरीची मुलगी महाश्वेता ती तूं व तिचा पुण्डरीक हा स्वत: वरलेला पति. पुण्डरीकाचें शरीर रक्षण करण्याची जबाबदारी त्यानें आपल्याकडे घेतली व तुला त्याप्रमाणें धीर दिला.

तो आकाशांत जाऊं लागला, मी त्याच्यामागून आका-

शांत गेलों. तारामंडळ ओलांडून आम्ही. चंद्रलोकांत गेलों. तिथें त्यानें रत्नमय पलंगावर मृत पुण्डरीकाला ठेवलें. तो तेथें सुरक्षित आहे. 'ह्यावर कांहीं उपाय हवा असेल तर तूं श्वेतकेतूंजवळ जा' असें त्यानें मला सांगितलें. दुःखानें बेभान होऊन मी तिथून भरधांव निघालों. वाटेंत एका रागीट देवाला माझा धक्का लागला. उद्दामपणें घोडया-सारखा मी धक्का दिला असें समजून 'तूं घोडा होऊन पृथ्वीवर जन्म घे' असा शाप त्यानें मला दिला. मी विन-वणी करून उःशाप मागितला.'ज्या धन्याचा तूं घोडा होशील त्याच्या मृत्यूनंतर तूं पुन्हां मनुष्य होशील' असें मला त्या देवानें सांगितलें. त्याच्याकडून मला हेंहि कळलें कीं शापाच्या प्रभावानें चंद्र तारापीडाचा मुलगा चंद्रापीड होईल, पुण्डरीक शुकनासाचा मुलगा वैशंपायन होईल व मी चंद्रापीडाचा घोडा इंद्रायुध बनेन. त्याप्रमाणें मी घोडा बनलों होतों, तो आतां मी मनुष्य झालों. वैशंपायन तुझ्या शापानें पोपट झाला. पण आतां तुमचे 'दोघींचे दुःखाचे दिवस संपत आले आहेत.' इतकें म्हणून कपिञ्जल आकाशांत उडून गेला.

आपल्या दैवांत जें आहे तें अटळ आहे; असें मानून सुखाच्या आशेवर आकाशवाणींत सांगितल्याप्रमाणें त्या दोघी वागूं लागल्या.

कांहीं दिवसांत तारापीड व विलासवती महाश्वेतेच्या आश्रमाकडे गेली. कादंबरीचे आईवडिलहि तिथें गेले.

सगळा चमत्कार ऐकल्यावर त्यांची मति गुंग झाली. सर्व-जण चंद्रापीड व वैशंपायन यांच्या जीवंत होण्याची वाट पाहात बसली. तीं सतत प्रार्थना करीत होतीं. चंद्रापीडाचें शरीर जास्त जास्त तेजस्वी झालें. शेवटीं एके दिवशीं सर्वांची तपश्चर्या सफळ झाली. चंद्रापीड व वैशंपायन जीवंत झाले. सगळ्यांना आनंद झाला. पुनर्जन्माचाच आनंद तो! कादंबरी व महाश्वेता यांची आनंदानें काय स्थिति झाली असेल ह्याची कल्पना करणेंच बरें.

चित्ररथानें कादंबरीबरोबर आपलें राज्यहि चंद्रापीडाला दिलें. शुकनास–मनोरमेनें महाश्वेतेला आपली सून म्हणून स्वीकारलें. सर्वांनीं सुखाचें शिखर गांठलें.

२०९६३
बालवाङ्मय
८२१
२५।१२।५६

४४५८
जा ९ा

IRBK-0105456
IRBK-0105456

## संस्कृत साहित्य सरितेचीं पुस्तकें

१६

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित : भाग १
११. दशकुमारचरित : भाग २
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. ऊरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय

६ आणे

प्रत्येकीं किंमत ६ आणे

वोरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि.